। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON - 425001

रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५


जा.क्र.उमवि/५/विस्तार मान्यता- २०१३-१४/८/४९८/२०१४. दि. ४/९/२०१४.

INWARD
COE: 121
MODE: By Hand

प्रति,

मा.प्राचार्य,

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे

कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी जळगांव.

विषय :- मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेली याचिका क्र.८६४८/२०१३ च्या अनुषंगाने मे. न्यायालयाने दि. २१/१०/२०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून एम.ई. इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टम(Intake 18) या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्नतेच्या मान्यतेबाबत ....

संदर्भ :- 1) ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली यांचे पत्र क्र. Western/1-1468609932/2013/EOA, dated 19.03.2013.

2) शासन निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.TEM-2013/C.R.No-177/TE-4, dated 15.05.2013.

3) मे.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल Writ Petition No. 8648/2013, Dt.21/10/2013.

4) उमवि पत्र जा.क्र. NMU/05/D.O.No. / 410/ 2013, Dated : 26.10.2013.

5) विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/5/टे.क्र. 8/228/2014.

6) विद्यापरीषदेचा ठराव क्र. वि.प.वी.-120/2014, दि. 27 मे 2014.

7)आपले पत्र क्र. Coeit/Jal/admn/2014-15/15, Dt. 28.8.2014.

महोदय,

ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार आपल्या महाविद्यालयास / मान्यताप्राप्त परिसंस्थेस शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विस्तारास मान्यता प्रदान केलेली आहे. ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाने परवानगी दिलेली असली तरी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 मधील तरतूदीनुसार नविन अभ्यासक्रमांना विद्यापीठाची प्रथम संलग्नता घेणे आवश्यक आहे.

तथापि,आपण विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झालेली नसतांना विद्यार्थी प्रवेशित केल्यामुळे व त्या संदर्भात आपण संदर्भ क्र. 3 अन्वये मे. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. 8648/2013 दाखल केलेली होती. सदर याचिकेच्या संदर्भात मे. न्यायालयाने दि.21/10/2013 रोजी दिलेल्या आदेशानुसार आपल्या महाविद्यालयाच्या विस्तारासंदर्भात तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारा, संदर्भिय पत्र क्रमांक 04 अन्वये स्थानिक चौकशी समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर समितीने आपल्या महाविद्यालयास/ परिसंस्थेस भेट देवून त्याबाबतचा अहवाल विद्यापीठास सादर केलेला होता. परंतु अटींची पूर्तता न झाल्यामुळे स्थानिक चौकशी समितीच्या अहवालात नमुद केलेल्या अटींची मार्च 2014 अखेरपर्यंत पूर्तता करणेबाबत आपणास कळविण्यात आले होते. त्यानुसार आपल्या महाविद्यालयाने दि. 28.3.2014 रोजी पूर्तता अहवाल सादर केला होता. आपण सादर केलेल्या पूर्तता अहवालाची पडताळणी करणेसाठी पुन्हा एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल मा. विद्यापरीषदेच्या दि. 27/5/2014 रोजीच्या सभेत सादर केला असता त्या संदर्भात मा. विद्यापरीषदेने ठराव क्र. वि.प.वी. 120/2014 नुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत केलेला आहे.

"के.सी.ई. अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव यांनी शैक्षणिक वर्ष 2013-14 साठी एम.ई. (इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टम )या नविन अभ्यासक्रमासाठी प्रथम संलग्नीकरण मिळणेसाठी मे. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केलेली याचिका क्रमांक 8648 संदर्भात मे. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रथम संलग्नीकरणाबाबत मान्यता देण्याबाबत विद्यापीठाने पाठविलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या दि. 21.4.2014 रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने समितीने सदर महाविद्यालयात प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक यांच्या नेमणूका केलेल्या नाहीत. विद्यार्थी व प्राध्यापक गुणोत्तर प्रमाण ठेवण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे प्रयोगशाळेची पूर्तता सुध्दा केलेली नाही. या अहवालाच्या

अनुषंगाने अधिष्ठातांसह विशेष छाननी समितीने सदर महाविद्यालयास एम.ई. भाग I (इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टम) या विषयास प्रथम संलग्नता व विद्यार्थी प्रवेश देवू नये असा अहवाल सादर केलेला असून विद्यापरीषदेने सदर अहवाल मान्य करावा असे सर्वानुमते ठरले"

त्यानुसार महाविद्यालयास विद्यापीठाचे दि. 2.6.2014 च्या पत्रान्वये अटी व शर्तींची पूर्तता करणेबाबत कळविण्यात आलेले होते. तद्नंतर आपण संदर्भ क्र. 6 अन्वये अटी पूर्तता अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालनुसार एम.ई. इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टम या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी 04 पैकी 01 अधिव्याख्यात्याचे पदे भरलेले असल्याने तसेच स्थानिक चौकशी समितीने नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता केल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालयास उर्वरीत रिक्त पदे 03 महिन्यांच्या आत भरण्यात येतील असे मा. अध्यक्ष व प्राचार्यांच्या संयुक्त सहीचे हमीपत्र सादर करण्याच्या अटीवर तसेच आपणांस ज्या शासन निर्णयान्वये विस्तारास मान्यता प्रदान करण्यांत आलेली आहे त्या शासन निर्णयातील अटी/त्रुटींची तीन महिन्याच्या आंत पूर्तता करुन विद्यापीठाच्या संलग्नता विभागास अटी-पूर्तता अहवाल सादर करण्याच्या अटींवर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ चे कलम ८३(४) नुसार खालील नमूद करण्यांत आलेल्या विस्ताराच्या प्रकारास मा. विद्यापरीषदेच्या वतीने मा. कुलगुरू महोदयांनी प्रथम संलग्नता प्रदान केली आहे. आपणांस विस्ताराकरिता देण्यांत येत असलेली मान्यता ही शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या एका वर्षाकरीता राहील व सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करुन घेणे आपणांस बंधनकारक राहील. याची कृपया नोंद घ्यावी. आपणांस विदीत करण्यांत येते की, आपण आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत परिनियम ४१५(१) नुसार उर्वरीत शिक्षकांची नियुक्ती करुन सदर नियुक्तीचे प्रस्ताव विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागास सादर करुन त्यास त्वरीत विद्यापीठाची मान्यता घेण्यांत यावी.

| Sr. No. | Name of College/Recognized Institute | Type of Extension | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | New Course | New Subjects | New Faculty | Additional Division | Increase in Intake / Second Shift etc |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड इन्फॉरमेशन टेक्नालॉजी जळगांव. | M.E.Electrical Power System- 18 | -- | -- | -- | |

कळावे.

आपला विश्वासू
(डॉ.दि.गो.हुंडीवाले)
संचालक(बी.सी.यु.डी. विभाग)

प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१) मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 400032.

२) मा.संचालक, तंत्र शिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य -3,महापालीका मार्ग,पत्रपेटी क्र. 1967,मुंबई 400001.

३) मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नविन शासकिय तंत्रनिकेतन परीसर, पो.बॉ.नं. 219, सामनगांव रोड, नाशिकरोड, नाशिक.

४) मा. परिक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, उमवि, जळगांव.

५) मा.संगणक विभाग प्रमुख, संगणक विभाग, परीक्षा विभाग, उमवि, जळगांव.

६) सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता विभाग, उमवि, जळगांव.

७) सहा. कुलसचिव, अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखा, परीक्षा विभाग, उमवि जळगांव.

8) समन्वयक विद्यार्थी सहायता ई सुविधा केंद्र, उमवि, जळगांव.